अपर पोलीस आयुक्त
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग यांचे कार्यालय
९१, सर पोचखानवाला रोड, वरळी, मुंबई–४०००३०
दुरध्वनी क्र.– ०२२–२४९२१२१२(विस्ता)
Email : addlcpacbmumbai@mahapolice.gov.in

दिनांक :– ०४/११/२०२२.

# प्रेस नोट

| | | |
|---|---|---|
| १ | ला.प्र.वि.कार्यालय | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभाग, मुंबई |
| २ | गु.र.क्र. | ४१/२०२२ |
| ३ | कलम | कलम ७ भ.प्र.अधि. १९८८ |
| ४ | आरोपीचे नाव कार्यालयाचा पत्ता | लोकसेवक श्री. सतिश विश्वनाथ पोवार, वय ५७ वर्षे, वर्ग–१, कार्यकारी अभियंता, बृहन्मुंबई महानगरपालिका, के/पूर्व विभाग, अंधेरी पूर्व, मुंबई–४०००६९ |
| ५ | मागणी केलेली लाचेची रक्कम | **रुपये ५०,००,०००/–** |
| ६ | स्विकारलेली लाचेची रक्कम | **रुपये ५०,००,०००/–** |
| ७ | हस्तगत लाचेची रक्कम | **रुपये ५०,००,०००/–** |
| ८ | थोडक्यात हकीगत | फिर्यादी हे काम करीत असलेल्या कंपनीच्या परिसरात असलेले शेड है अनधिकृत असलेबाबत दिनांक १३/१०/२०२२ रोजी बृहन्मुंबई महानगरपालिका के/पूर्व, अंधेरी पूर्व यांच्याकडून फिर्यादी यांच्या कंपनीला नोटीस प्राप्त झाली होती त्याबाबत फिर्यादी यांनी दि. १९/१०/२०२२ रोजी लोकसेवक यांच्या कार्यालयात उत्तर सादर केले होते. त्यानंतर दि. २८/१०/२०२२ रोजी संबंधित बृहन्मुंबई महानगरपालिका के/पूर्व, अंधेरी पूर्व विभागातील मनपा कर्मचारी व अधिकारी यांनी फिर्यादी यांच्या कंपनीच्या परिसरामध्ये येवून नमुद शेड निष्कासित करण्यास सुरुवात केली. त्यावेळी फिर्यादी यांनी नमुद विभागाचे कार्यकारी अभियंता लोकसेवक श्री सतिश पोवार यांना संपर्क केला असता, त्यांनी फिर्यादी याना त्यांच्या कार्यालयात भेटण्यास बोलावून सदरची निष्कासन कारवाई थांबविण्याकरिता फिर्यादी यांच्याकडे रू ५०,००,०००/–(रूपये पन्नास लाख) लाचेची मागणी केली.<br><br>फिर्यादी यांना लाच देण्याची इच्छा नसल्यामुळे त्यांनी दि. ३१/१०/२०२२ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग येथे प्रत्यक्ष येवून तक्रार अर्ज दिला<br><br>नमूद तक्रारीच्या अनुषंगाने दि. ०१/११/२०२२ रोजी करण्यात आलेल्या पडताळणीदरम्यान आलोसे यांनी फिर्यादी यांच्याकडे रू. ५०,००,०००/– इतक्या रकमेची लाच स्वरूपात मागणी करून ती स्विकारण्याचे कबूल केले<br><br>दि. ०४/११/२०२२ रोजी सापळा कारवाई दरम्यान लोकसेवक यांनी मागणी केलेल्या रू. ५०,००,०००/– लाचेची रक्कम फिर्यादी यांच्याकडून स्विकारली असता त्यांना रंगेहात पकडण्यात आले. म्हणून त्यांच्या विरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ कलम ७ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला |

**मार्गदर्शन अधिकारी:– श्री विजय पाटील सो., अपर पोलीस आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभाग**

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई बृहन्मुंबई विभागातर्फे नागरीकाना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाविरूध्द तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभागाशी संपर्क साधावा.

ASSTT. COMMISSIONER OF POLICE
सत्यमेव जयते
MUMBAI
ANTI CORRUPTION BUREAU

05/11/22

( संजय पाटील )
सहाय्यक पोलीस आयुक्त,(प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
मुंबई विभाग, मुंबई

संपर्क:–लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभाग, ९१,सर पोचखानवाला मार्ग, वरळी,मुंबई.
टोल फ्री क्र. १०६४, दुरध्वनी क्र. ०२२–२४९२१२१२,
फॅक्स क्र. ०२२–२४९२२६१८,
वेबसाईट – acbmaharashtra.gov.in, ईमेल : acbwebmail@mahapolice.gov.in,
ईमेल : addlcpacbmumbai@mahapolice.gov.in,फेसबुक: www.facebook.com Maharashtra ACB.
मोबाईल ॲप : www.acbmaharashtra.net.

Scanned with CamScanner